**वसई-विरार शहर महानगरपालिका**
**मुख्य कार्यालय, विरार**
**ता.वसई, जि.पालघर**

जा.क्र.वविशम/वाहन/३५७ /२०२२
दिनांक :- १६-११-२०२२

# जाहीर दरपत्रक

याव्दारे सर्व पुरवठादार, संस्था व व्यक्ती यांचे माहितीसाठी कळविण्यांत येते की, वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत आयोजित केलेल्या १० व्या राष्ट्रीय स्तरीय मॅरेथॉन स्पर्धा - २०२२ करिता रस्त्यावरील वाहने उचलणेकामी दि. १०/१२/२०२२ व दि. ११/१२/२०२२ रोजी टोईंग व्हॅन वाहने पुरवठा करणेकामी इच्छुक व्यक्ती, पुरवठादार व संस्था यांचेकडुन दि.२४/११/२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजता बंद पाकीटातुन दरपत्रक (कोटेशन) मागविण्यात येत आहेत. सदरची दरपत्रके मुख्यालय, वाहन विभागात सादर करण्यात यावी.

| अ.क्र. | वाहन प्रकार | आवश्यक संख्या | रक्कम (१ नग करिता) |
|---|---|---|---|
| १ | टोईंग व्हॅन हलकी वाहने उचलणे कामी | २ | |
| २ | टोईंग व्हॅन जड वाहने उचलणे कामी | ३ | |

## अटी-शर्ती

१) पुरवठादाराने स्वत:चे लेटर पॅडवर दरपत्रक सादर करावे. दरपत्रकावर वस्तु व सेवा कर नोंदणी क्रमांक (GST) असणे बंधनकारक राहील.

२) मालकाचे/संस्थेचे पॅनकार्ड झेरॉक्स प्रत जोडण्यात यावे.

३) दरपत्रक मुदतीमध्ये व वेळेमध्ये मुख्य कार्यालयातील आवक-जावक विभागात सादर करणे बंधनकारक राहील.

४) दरपत्रकास मंजुरीची समज दिल्यानंतर कार्यालयात उपस्थित राहुन करारनामा करणे बंधनकारक राहील.

५) मुदतीत करारनामा न केल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.

६) दरपत्रकात दर सादर करताना मुळ किंमत, वस्तु व सेवा कर (GST) व इतर सर्व करासहीत भरावयाचे आहेत.

७) मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार मा.उप. आयुक्त यांना राहील.

८) वरील अटीचे पालन जे पुरवठादार करणार नाहीत त्यांचे दरपत्रक पडताळणीअंती अपात्र ठरविण्यात येईल.

९) यासंबंधीची दरपत्रके स्वत:चे लेटर पॅडवर बंद पाकीटातुन दि.२४/११/२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजता मुख्य कार्यालय, विरार येथे सादर करावीत.

मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दि. २४/११/२०२२ रोजी दु. ३.०० वा. मा.उप.आयुक्त यांचे दालनात उपस्थित दरपत्रकावर अथवा त्यांचे प्रतिनिधी ह्यांचे समक्ष उघडण्यात येतील.

सही/-
(नानासाहेब कामठे)
उप.आयुक्त (वाहन)
वसई विरार शहर महानगरपालिका